स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,**
**फोर्ट, मुंबई- ४००००१.**

**दूरध्वनी क्र.०२२-२२०१ ७१०३** **E-Mail- est14-rdd@mah.gov.in**

---

क्रमांक. जिपब-२०२२/ प्र.क्र.२९/आस्था-१४ दिनांक : २० ऑक्टोबर, २०२२.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय : सन २०२२ मधील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत वेळापत्रक.**

**संदर्भ :** १) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था.१४, दिनांक ०७.०४.२०२१.
२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था.१४, दिनांक ०४.०५.२०२२.
३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-२०२२/प्र.क्र.२९/आस्था.१४, दिनांक २९.०६.२०२२.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्याबाबतचे सुधारित धोरण संदर्भ क्र.१ येथील दिनांक ०७.०४.२०२१ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहे.

सन २०२२ मध्ये होणाऱ्या बदल्यांकरिता पदावधीची परिगणना दिनांक ३१ मे ऐवजी दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत करण्यास संदर्भ क्र.२ येथील दिनांक ४.५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये तरतुद करण्यात आली आहे. तसेच सन २०२२ मध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी संदर्भ क्र .३ येथील दिनांक २९.६.२०२२ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या कालावधीनुसार बदल्यांबाबतची कार्यवाही संगणक प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. उक्त दिनांक ४.५.२०२२ व दिनांक २९.६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार होणारी कार्यवाही फक्त सन २०२२ मध्ये होणाऱ्या बदल्यांकरिताच लागू राहील.

आता ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबत खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | बाब | दिनांक | | लागणारा कालावधी | संबंधित अधिकारी/ कर्मचारी/प्रणाली |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| १ | अवघड क्षेत्रांची यादी प्रकाशित करणे | २१.१०.२०२२ | २२.१०.२०२२ | २ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | बदलीपात्र आणि बदली अधिकारप्राप्त याद्या जाहीर करणे | २१.१०.२०२२ | २२.१०.२०२२ | २ | शिक्षणाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | रिक्त पदांची यादी अद्ययावत करणे | २१.१०.२०२२ | २५.१०.२०२२ | ५ | गट शिक्षणाधिकारी / शिक्षणाधिकारी |
| ४ | विशेष संवर्ग भाग-१ आणि विशेष संवर्ग भाग-२ चे फॉर्म भरणे | २६.१०.२०२२ | २८.१०.२०२२ | ३ | शिक्षक |
| ५ | बदलीपात्र आणि बदली अधिकारप्राप्त याद्या पुनः जाहीर करणे आणि विशेष संवर्ग भाग १ व भाग २ यांच्या याद्या जाहीर करणे | २९.१०.२०२२ | २९.१०.२०२२ | १ | शिक्षणाधिकारी |
| ६ | शिक्षणाधिकाऱ्यांकडे अपील करणे | ३०.१०.२०२२ | ०१.११.२०२२ | ३ | शिक्षक |
| ७ | अपील मंजूर करणे किंवा नाकारणे | ०२.११.२०२२ | ०५.११.२०२२ | ४ | शिक्षणाधिकारी |
| ८ | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे अपील करणे | ०६.११.२०२२ | ०७.११.२०२२ | २ | शिक्षक |
| ९ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेणे | ०८.११.२०२२ | १०.११.२०२२ | ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १० | बदली पात्र व बदली अधिकारप्राप्त, विशेष संवर्ग भाग १ व भाग २ यांच्या याद्या पुनः जाहीर करणे | ११.११.२०२२ | ११.११.२०२२ | १ | शिक्षणाधिकारी |
| ११ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | १२.११.२०२२ | १२.११.२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १२ | विशेष संवर्ग भाग-१ साठी प्राधान्यक्रम भरणे | १३.११.२०२२ | १५.११.२०२२ | ३ | शिक्षक |
| १३ | विशेष संवर्ग भाग-१: बदली प्रक्रिया चालवणे | १६.११.२०२२ | १८.११.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| १४ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | १९.११.२०२२ | १९.११.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १५ | विशेष संवर्ग भाग-२ साठी प्राधान्यक्रम भरणे | २०.११.२०२२ | २२.११.२०२२ | ३ | शिक्षक |
| १६ | विशेष संवर्ग भाग-२: बदली प्रक्रिया चालवणे | २३.११.२०२२ | २५.११.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| १७ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | २६.११.२०२२ | २६.११.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| १८ | बदली अधिकारप्राप्त शिक्षकांनी प्राधान्यक्रम भरणे | २७.११.२०२२ | २९.११.२०२२ | ३ | शिक्षक |
| १९ | बदली अधिकारप्राप्त: बदली प्रक्रिया चालवणे | ३०.११.२०२२ | ०२.१२.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| २० | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | ०३.१२.२०२२ | ०३.१२.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २१ | बदलीपात्र शिक्षकांनी प्राधान्यक्रम भरणे | ०४.१२.२०२२ | ०६.१२.२०२२ | ३ | शिक्षक |
| २२ | बदलीपात्र: बदली प्रक्रिया चालवणे | ०७.१२.२०२२ | ०९.१२.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| २३ | रिक्त पदांची यादी प्रकाशित करणे | १०.१२.२०२२ | १०.१२.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | विस्थापित शिक्षकांच्या राऊंडसाठी पर्याय भरणे | ११.१२.२०२२ | १३.१२.२०२२ | ३ | शिक्षक |
| २५ | विस्थापित शिक्षकांचा राऊंड : विस्थापित शिक्षकांसाठी बदली प्रक्रिया चालविणे | १४.१२.२०२२ | १६.१२.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| २६ | रिक्त पदांची यादी जाहीर करणे | १७.१२.२०२२ | १७.१२.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २७ | बदलीपात्र शिक्षकांची (१० वर्षे सुगम क्षेत्रात काम केलेले शिक्षक) यादी प्रसिद्ध करणे | १८.१२.२०२२ | १८.१२.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २८ | अवघड क्षेत्रातील राहिलेल्या रिक्त जागा भरण्याचा राऊंड | १९.१२.२०२२ | २१.१२.२०२२ | ३ | शिक्षक |
| २९ | अवघड क्षेत्रातील राहिलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी बदली प्रक्रिया चालविणे | २२.१२.२०२२ | २४.१२.२०२२ | ३ | सॉफ्टवेअर |
| ३० | बदलीचे आदेश प्रकाशित करणे | २५.१२.२०२२ | २५.१२.२०२२ | १ | मुख्य कार्यकारी अधिकारी |

राज्यातील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे होणाऱ्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबतची कार्यवाही उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात यावी. तसेच सदरची बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व प्राथमिक शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्याबाबत संबंधित शिक्षकांकडून पोहोच घ्यावी व आपल्या अभिलेखामध्ये जतन करुन ठेवावी.

**(का. गो. वळवी)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

१) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व)
२) श्री.आयुष प्रसाद (भाप्रसे), मु. का. अ., जि. प., पुणे तथा अध्यक्ष, जि. प. शिक्षक बदली अभ्यासगट.
३) डॉ.सचिन ओंबासे (भाप्रसे), जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
तत्कालीन मु.का.अ., जि.प. वर्धा तथा राज्य समन्वयक, जि.प.शिक्षक बदली ऑनलाईन संगणक प्रणाली
४) श्री.विनय गौडा (भाप्रसे), सध्या जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
तत्कालीन मु.का.अ., जि.प.सातारा तथा राज्य समन्वयक, जि.प.शिक्षक बदली ऑनलाईन संगणक प्रणाली
५) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व)
७) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
८) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
९) Vinsys IT Services (I) Pvt. Ltd, Shivaji Niketan, Tejas Society, Kotharud, Pune.
१०) निवडनस्ती कार्यासन आस्था.१४, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.